# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक १८/११/२०२५

## मोटार सायकल चोरीचे २० गुन्हे उघड , १८ मोटर सायकल , ४ लाख ९७ हजारांचा मुद्देमाल जप्त २ आरोपी अटक, काटोल पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक १२/११/२०२५ रोजी पोलीस स्टेशन काटोल चे गुन्हे प्रकटीकरणाचे अधिकारी अंमलदार यांना गुप्तबातमीदारकडुन खात्रीशिर माहीती प्राप्त झाली की, आरोपी नामे १) वैभव प्रकाश कावडकर रा. रामदेवाबाबा ले आउट काटोल ता काटोल जि नागपुर आणि २) रवेश ज्ञानेश्वर पवार, रा. सारवाही ता. कारंजा जि वर्धा यांनी अनेक मोटर सायकल चोरीचे गुन्हे केले आहे. आरोपी वैभव प्रकाश कावडकर रा. काटोल हा तळयाची पार काटोल येथे येत असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाल्याने काटोल पोलीसांनी तळयाची पार काटोल येथे सापळा रचुन आरोपी वैभव प्रकाश कावडकर याला एक मोटर सायकल घेवुन येत असतांना ताब्यात घेतले. पोलीसांनी त्याला त्याचे कडे असलेल्या मोटर सायकल बाबत विचारपुस करून सदर मो.सा ची माहीती काढली असता सदर मो.सा चोरीचा गुन्हा पोलीस स्टेशन कोंढाळी येथे नोंद असल्याचे समजले. सदर आरोपी ला अटक करून त्याचे कडे सखोल चौकशी करत दिनांक १४/११/२०२५ रोजी पोलीसांनी त्याचा साथीदार रवेश ज्ञानेश्वर पवार, वय २६ वर्षे, रा. सारवाडी, ता. कारंजा जि वर्धा याला नारा फाटा, कारंजा जि वर्धा येथुन ताब्यात घेवुन अटक केली. **काटोल पोलीसांनी कौशल्यपुर्ण तपास करीत मोटर सायकल चोरीचे २० गुन्हे उघडकीस आणले. त्यापैकी १५ गुन्हे पोलीस स्टेशन काटोल येथे दाखल आहे. ३ गुन्हे पोलीस स्टेशन नरखेड येथे दाखल आहे. १ गुन्हा पोलीस स्टेशन कोंढाळी येथे दाखल आहे. तसेच १ गुन्हा पोलीस स्टेशन वाडी, नागपुर शहर येथे दाखल आहे. नमुद आरोपीतांच्या ताब्यातुन १८ मोटर सायकल किंमती ४,९७,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**


पोलीस ठाणे काटोल

लोकमत

# अट्टल वाहन चोरटे पोलिसांच्या जाळ्यात

## १८ दुचाकी वाहने जप्त : काटोल पोलिसांची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क



**नागपूर/काटोल :** दुचाकी वाहने चोरीला जाण्याचे प्रमाण वाढत असताना काटोल पोलिसांच्या पथकाने नुकत्यात केलेल्या कारवाईमध्ये दोन अट्टल वाहन चोरट्यांना अटक केली. त्यांच्याकडून ४ लाख ९७ हजार रुपये किमतीची १८ दुचाकी वाहने जप्त करण्यात आली असून, २० गुन्हे उघड झाले आहेत, अशी माहिती काटोलचे ठाणेदार रणजीत शिरसाठ यांनी दिली.

वैभव प्रकाश कावडकर, रा.रामदेवबाबा ले-आउट, काटोल आणि रवेश ज्ञानेश्वर पवार, रा.सारवाडी, ता.कारंजा (घाडगे), जिल्हा वर्धा अशी अटक करण्यात आलेल्या आरोपी चोरट्यांची नावे आहेत. मागील काही महिन्यांपासून काटोल शहर आणि परिसरातून दुचाकी वाहने चोरीला जाण्याचे प्रमाण वाढत चालले होते. या चोरीत वैभव कावडकर याचा सहभाग असल्याची तांत्रिक माहिती पोलिसांना मिळाल्याने ते त्याच्या मागावर होते. तो काटोल शहरातील तळ्याच्या पार परिसरात येत असल्याचे कळताच, पोलिसांनी सापळा रचला. तो मोटारसायकलने येत असल्याचे दिसताच, शिताफीने ताब्यात घेत त्याला विचारपूस केली. त्याने गुन्ह्याची कबुली देत साथीदाराचे नाव सांगितले.

दरम्यान, रवेश हा नारा फाटा, ता.कारंजा (घाडगे), जिल्हा वर्धा येथे आढळून येताच, पोलिसांनी त्यालाही ताब्यात घेत दोघांना अटक केली. त्या दोघांकडून वेगवेगळ्या ठिकाणांहून एकूण १८ दुचाकी वाहने जप्त केली असून, वाहनचोरीच्या घटना उघड होण्याची शक्यता पोलिस अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणी काटोल पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी पराग पोटे यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार रणजीत शिरसाठ, सहायक पोलिस निरीक्षक विवेक राऊत, उपनिरीक्षक कृष्णा गोंगले, हवालदार कैलास उईके, रणजीत जाधव, प्रवीण पवार, गौरव बखाल, राणा संतापे, दशरथ पवार यांच्या नेतृत्वातील पथकाने केली.

## ४.९७

### लाखांचा मुद्देमाल जप्त

काटोल पोलिसांनी त्या दोन्ही चोरट्यांकडून वेगवेगळ्या कंपनीची १८ दुचाकी वाहने जप्त केली असून, त्या वाहनांची एकूण किंमत ४ लाख ९७ हजार रुपये आहे. दोन मोटारसायकली आर्वी, जिल्हा वर्धा पोलिस ठाण्याच्या हद्दीतून जप्त केली आहेत. त्यांच्याकडून वाहन चोरीचे २० गुन्हे उघड झाले आहेत. यातील १५ गुन्हे काटोल पोलिस ठाण्यातील असून, तीन गुन्हे नरखेड, तसेच कोंढाळी आणि वाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील प्रत्येकी एका गुन्ह्याचा समावेश आहे. दोन्ही चोरट्यांना न्यायालयाने पोलिस कोठडी सुनावली आहे.